MHLA050003682021

लवाद दरखास्त क्र.११३२/२०२१
बालाजी वि. काला व अन्य

## नि.क्र.३५ खालील आदेश

सदर अर्ज दरखास्तदाराने देवून नमूद केले की, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या लवाद अपील क्र.३१/२०२५ मधील निर्णयानूसार अपील नामंजूर होवून या न्यायालयात जमा असलेली निवाडयाची रक्कम, प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर यांच्यापुढे हमीपत्र घेवून काढून घेण्यास परवानगी दिली आहे. अर्जदाराने दिलेले हमीपत्र मा. जिल्हा न्यायालयाने स्वीकारले आहे. त्यामुळे, निवाडयाची रक्कम अर्जदारास मिळावी अशी विनंती करण्यात आली.

**०२.** सहा. अधिक्षकांनी दिलेल्या अहवालानूसार निवाडयाची रक्कम मुदतठेवीमध्ये गुंतवलेली आहे.

**०३.** मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार लवाद दरखास्त क्र.११३२/२०२१ (मुळ लवाद अर्ज क्र.१५५/२०२१) मधील रुपये ५१,९३,६७१/- ही रक्कम व त्यावरील व्याज हे ज्या मुदतठेव पावती क्र.९१५१७७० मध्ये गुंतवून ठेवले आहे, ती रक्कम अर्जदारास अदा करण्यात यावी. त्याकरीता ठेव पावती मुदतपुर्व मोडावी. ठेव पावतीतील रक्कम व त्यावरील व्याज अर्जदाराची योग्य ती ओळख पटवून त्यास द्यावे.

स्वाक्षरीत/-
**[एस.एन.सरडे]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर

दिनांक:१२/०६/२०२६.